


# प्रदीप लोखंडे, पुणे – १३

**प्रदीप लोखंडे, पुणे -१३** भारदस्त, भावुक व उत्कंठावर्धक प्रेरक जीवनकहाणी आहे. निष्णांत शब्दरचनाकार सुप्रसिद्ध लेखक सुमेध वडावाला (रिसबुड) यांच्या सिद्धहस्त लेखणीतून उलगडली आहे. वाईचा (सातारा) सुपुत्र ते 'रुरल रिलेशन्स' '(पुणे ) नेटवर्किंग संस्थापक अशी विस्मयकारी गरुडझेप आणि 'रुरल मार्केटिंग' क्षेत्रातील प्रतिकूल परिस्थितील 'शून्य' प्रारंभ पासून ते कोटी पर्यंतची एकल भरारी स्पृहणीय आहे. प्रस्तुत पुस्तकातील प्रसंग आणि अनुभव थेट मनाला भिडतात.

उमेदीच्या काळातील संघर्ष, पचविलेले अपयश, स्वकर्तुत्वाने कमाविलेले यश यासाऱ्यांचा लेखाजोखा अचंबित करतो. दिलदार राजा मित्रांची पदोपदी लाभलेली साथ, कुटुंबियांचा विशेषतः वडील अण्णांचा भरभक्कम पाठींबा, हितचिंतकांचे पाठबळ, सहचारिणीची सार्थकी पाठराखण, नामवंत कंपनीचे सुजाण वरिष्ठ अधिकारी, पारखी नजरेचे खंदे राजकारणी आणि निव्वळ पत्रव्यवहाराद्वारे ग्रामीण भागाशी जोडलेली अतूट नाळ मर्मस्पर्शी जीवन कहाणीचे प्रबळ उर्जा स्त्रोत्र आहेत.

यशस्वी व मुरब्बी **'आंत्रपेन्युअर'** म्हणून खणखणणारे नाणे वाजवीत 'रुरल मार्केटिंग शिखर' पादांक्रात करण्यापर्यंतचा व अढळतेने स्थिरावण्याचा प्रदीप लोखंडे यांचा इत्यंभूत प्रवास वास्तविक **'दीपस्तंभ'** आहे. त्यांच्या जीवनपट कहाणीचे दखलपात्र **USP** खालीलप्रमाणे आहेत. ज्याद्वारे यशस्वीपणे मजल गाठता आली. नावलौकिक व मानसन्मान लाभलेत.

१) पन्नासहून अधिक नामवंत कंपनी, कार्पोरेट ब्रान्ड व लोकप्रिय प्रोडक्टसची ग्रामीण भागातील तोंडओळख.
२) ७६०० हून अधिक ग्रामीण भागातील ग्राहकांपर्यंत 'रुरल रिलेशन्सचे' पसरविलेले अभेद्य विस्तीर्ण जाळे.
३) ८,५०,००० हून अधिक पत्रव्यवहार मध्यमाद्वारे '**Post Card Man of India**' म्हणून झालेली ओळख.
४) २७ हजारांहून अधिक खेड्यात नऊ लाखाहून अधिक पुस्तके भेट देण्याबाबत '**Laibrary Man**' किताब.
५) ज्ञानप्रसार उद्देशाने 'ग्यानकी वाचनालय' अशी विद्यार्थीप्रिय अभूतपूर्व वाचन गोडी लावणारी कामगिरी.
६) जवळपास १८,४०० ग्रामीण शाळेत योग्य 'दात्या' मार्फत २३, ८०० संगणक पूर्तता व उपयुक्तता प्रसार.

( **टिप**: पत्रव्यवहार माध्यमातून ग्रामीण भागासाठी विणलेले जाळे 'रुरल रिलेशन्सचा' भरभक्कम पाया आहे. नव्वदीच्या दशकात प्रदीप लोखंडे नामक मराठी तरुण आर्थिकदृष्ट्या भार सोसून टपाल खात्याचे जोडपत्र लाखोंच्या पटीत खरेदी करून खात्याच्या महसुलात मोलाचा वाटा उचलतो. टपाल खाते प्रदीप लोखंडे, पुणे -१३ अश्या त्रोटक पत्यावर आलेली पत्रे प्राप्तकर्त्यास त्वरित व अचूकपणे वितरीत करते याचे विशेषत्वाने अप्रूप. पुणे ४११ ०१३ डिलिव्हरी टपाल कार्यालय स्टाफ व पोस्टमन निर्विवादपणे श्रेयकरी आहेत. पुस्तकाच्या शीर्षकानुसार प्रस्तुत बाबींवर किमान प्रकाशझोत हवा होता. )

**राजगणेश परशुराम घुमारे, धनकवडी, पुणे – ४११ ०४३.**
दिनांक २६ मे २०२६